20-05-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 5/20/2025 12:02 AM Page 1



## निवडक

### नार्वेत आजपासून नूतन मूर्ती प्रतिष्ठापना सोहळा

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**डिचोली, दि. १९ :** नार्वे येथील श्री लक्ष्मीनारायण नूतन मूर्ती प्रतिष्ठापना व मंदिर जीर्णोद्धार सोहळा मंगळवार दि. २० ते शुक्रवार दि. २३ या दरम्यान होणार आहे. या निमित्त दरदिवशी विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवार दि. २० रोजी संध्याकाळी ४ वाजता मंगलचरण प्रायश्चित विधी, विष्णूपुजन, विष्णू श्राद्धा राक्षोघ्न विधान होणार आहे.
बुधवार दि. २१ रोजी सकाळी ८ वाजता मंगलचरण, सामूहिक, स्वस्तिवाचन, मातृकापूजन नांदीश्राद्धा, आचार्यवरण मधुपर्कपूजा, कौतुकबंधन प्राकारशुद्धी, गंगापूजन, जलाधिवास, अग्म्युत्तारण, शांती होम, यासारखे विधी होणार आहेत. नंतर दुपारी देवतास्थापना व महाप्रसाद होईल. तर संध्याकाळी ५ वाजता स्थानिक भजना मंडळाकडून भजानाचा कार्यक्रम असणार आहे. गुरुवार दि. २२ रोजी सकाळी ८ ते दुपारी १ पर्यंत मंगलाचरण प्राकारशुद्धी, स्नानविधी, आवाहित, देवतापूजन, शय्याधिवास, अग्निस्थापना, ग्रहमंजल देवता स्थापना, वास्तुहोम, ग्रह यज्ञ, पर्याय होम व महाप्रसाद होईल. संध्याकाळी ५ वाजता भजन व इस्कॉन पणजीतर्फे कीर्तन होणार आहे. शुक्रवार दि. २३ रोजी सकाळी ७.१५ वाजता धार्मिक विधींना सुरवात होणार आहे. सकाळी ८ वाजता इस्कॉन पणजीचे अध्यक्ष अच्युत गोपाल दास यांच्या हस्ते शिखर कलश प्रतिष्ठापना होणार आहे. नंतर ८.४४ वाजता या शुभ मूहुर्तावर श्री लक्ष्मीनारायण देवाची मंत्रघोषात प्रतिष्ठापना संपन्न होईल व नंतर तत्वन्यास, महापूजा, पूजांग होम, बलीदान, पुर्णाहुती, महाआरती, अशीर्वाद, प्रार्थना आणि महाप्रसाद होईल. वरील सर्व विधींना लोकांनी उपस्थित राहत देवाचा आशीर्वाद व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, अशी विनंती देवस्थान समितीतर्फे करण्यात आली आहे.

---

### हेवी टेनीस बॉल क्रिकेट स्पर्धेत ए. के. इलेवन संघास जेतेपद




**सावईवेरे : विजेत्या पणजीच्या ए .के. इलेवन संघासोबत बाबू गावडे, अक्षय नाईक व प्रमोद बांदोडकर.**

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**सावईवेरे, दि. १९ :** सावईवेरे येथील मोरेश्वर स्पोर्ट्स अँड कल्चरल क्लबतर्फे आयोजित अखिल गोवा पातळीवर फ्लडलाईट हेवी टेनीस बॉल आमदार गोविंद गावडे चषक क्रिकेट स्पर्धेचे विजेतेपद पणजीच्या ए. के. इलेवन संघास प्राप्त झाले. विजेत्या संघाला रु.५० हजार तसेच आमदार गोविंद गावडे चषक देण्यात आला.
उपविजेतेपदासाठी ठेवण्यात आलेले २५ हजार रुपयांचे बक्षीस व चषक विर्डी – साखळीच्या किल्लू पापांनी संघास प्राप्त झाले. उपांत्य सामन्यात पराभूत झालेल्या मदनंत स्ट्राईकर्स, सावईवेरे व ऊर्वी क्रिकेटर्स, डिचोली संघांना प्रत्येकी १० हजार रुपयांचे बक्षीस देण्यात आले. याशिवाय मालिकावीर व सामनावीर पुरस्कार साहिल वायगणकर ( ए.के. इलेवन), उत्कृष्ट गोलंदाज – नवनाथ (कुल्लू पापांनी), उत्कृष्ट फलंदाज – प्रीतेश (ए. के. इलेवन) यांना वैयक्तिक बक्षिसे देण्यात आली.सदर स्पर्धा सावईवेरे येथील पंचायत मैदानावर पार पडली. बक्षीस वितरण सोहळा मंत्री गोविंद गावडे, उपसरपंच बाबू गावडे, पंच अक्षय नाईक व क्लबचे अध्यक्ष प्रमोद बांदोडकर यांच्या हस्ते पार पडला.

# आशिया कपमध्ये खेळणार भारत ?

### बीसीसीआयची भूमिका स्पष्ट

**नवी दिल्ली, दि. १९ :**




भारताने ऑपरेशन सिंदूरद्वारे पाकिस्तान आणि पीओकेतील दहशतवाद्यांच्या तळांवर कारवाई करत पहलगाम हल्ल्याचा बदला घेतला. मात्र त्यानंतर पाकिस्तानने भारतावर कुरघोडी करण्याचा प्रयत्न केला. मात्र भारतीय सैन्याने पाकिस्तानच्या प्रत्येक हल्ल्याला सडेतोड उत्तर दिले. त्यानंतर दोन्ही देशांमध्ये युद्धविरामाची घोषणा करण्यात आली. मात्र या सर्व प्रकरणानंतर दोन्ही देशातील संबंध आणखी बिघडले आहेत. अशात पाकिस्तानची खोड जिरवण्यासाठी बीसीसीआयने या आशिया कप २०२५ स्पर्धेत इंडिया वूमन्स आणि मेन्स टीम सहभागी होणार नसल्याचे म्हटले जात होते.

मात्र याबाबत बीसीसीआय सचिव दैवजित सैकीया यांनी प्रतिक्रिया दिली आहे. त्यामुळे सर्व चित्र स्पष्ट झाले आहे. भारत–पाकिस्तान यांच्यातील संबंध गेल्या अनेक वर्षांपासून ताणलेले आहेत. त्यामुळे




भारत – पाकिस्तान क्रिकेट टीम आयसीसीनंतर आशिया कप स्पर्धेतच एकमेकांविरुद्ध खेळतात. मात्र दोन्ही देशातील तणावानंतर बीसीसीआयने आशिया कप स्पर्धेत न खेळण्याचा निर्णय घेतल्याचा दावा, काही मीडिया रिपोर्ट्समध्ये करण्यात आला. बीसीसीआयने याबाबत एसीसी अर्थात आशियाई क्रिकेट परिषदेला सांगितल्याचाही दावा केला गेला. मात्र आता बीसीसीआयने याबाबत अधिकृत माहिती दिली आहे.

बीसीसीआयने आशिया कप २०२५ बाबतच्या वृत्ताचे खंडन केले आहे. बीसीसीआय सचिव दैवजित सैकीया यांनी पीटीआय या वृत्तसंस्थेला प्रतिक्रिया दिली. सध्या आशिया कप स्पर्धेबाबत एसीसीसह काहीही बोलणे न झाल्याचे सैकीया यांनी सांगितले.

एसीसीकडून आयोजित करण्यात येणाऱ्या आशिया कप आणि एमर्जिंग आशिया कप स्पर्धेत सहभागी न होण्याबाबत बीसीसीआयच्या निर्णयाबद्दलचे वृत्त पाहिले. या अशा बातम्यांमध्ये काहीही तथ्य नाही. कारण आतापर्यंत बीसीसीआयने एसीसीच्या आगामी स्पर्धेबाबत चर्चासुद्धा केलेली नाही. तसेच असा कोणताही निर्णय घेतलेला नाही, असे सैकीया यांनी स्पष्ट केले.

सध्या आमचे लक्ष हे आयपीएल २०२५ आणि त्यानंतर होणाऱ्या इंग्लंड दौऱ्यावर आहे. इंग्लंड दौऱ्यात मेन्स आणि वूमन्स टीम जाणार आहेत. आशिया कप किंवा इतर कोणत्याही एसीसी स्पर्धेचा मुद्दा कोणत्याही स्तरावर चर्चेसाठी आलेला नाही. तसेच एसीसी संबंधित स्पर्धेबाबत कोणताही निर्णय होईल त्याबाबत माध्यामांद्वारे माहिती दिली जाईल, असंही सैकीया यांनी नमूद केले.

बीसीसीआय सचिवांची प्रतिक्रिया

दरम्यान आशिया कप २०२५ स्पर्धेचे आयोजन हे सप्टेंबर मध्ये करण्यात आले आहे. या स्पर्धेचं यजमानपद भारताकडे आहे. तसेच गेल्या वेळेस पाकिस्ताकडे स्पर्धेचे यजमानपद होतं. त्यामुळे टीम इंडियाने आपले सर्व सामने हे श्रीलंकेत खेळले होते. टीम इंडियाने अंतिम सामन्यात श्रीलंकेवर मात करत आशिया कपवर नाव कोरले होते.

# साईचा ऑरेंज कॅपवर कब्जा

### ६ फलंदाजांनी ओलांडल्या ५०० धावा!

**नवी दिल्ली, दि. १९ :**

आयपीएल २०२५ ची ऑरेंज कॅप पुन्हा एकदा साई सुदर्शनकडे गेली आहे. त्याने दिल्ली कॅपिटल्स विरुद्धच्या सामन्यात ही कामगिरी केली. दिल्ली विरुद्धच्या सामन्यापूर्वी त्याने ११ सामन्यात ५०९ धावा केल्या होत्या. यशस्वी जयस्वाल त्याच्यापेक्षा फक्त १४ धावांनी पुढे होता, त्यामुळे सुदर्शनने पुन्हा एकदा दिल्ली विरुद्ध १५ धावा करत ऑरेंज कॅप मिळवली. यासोबतच, त्याने आयपीएलच्या कोणत्याही हंगामात त्याच्या वैयक्तिक धावसंख्येत सुधारणा केली आहे.

आता साई सुदर्शनने ऑरेंज कॅपच्या शर्यतीत खूप पुढे पाऊल ठेवले आहे. या यादीत दुसऱ्या क्रमांकावर राजस्थान रॉयल्सचा यशस्वी जयस्वाल आहे, ज्याने हंगामात ५२३ धावा केल्या. त्याच वेळी, सुदर्शनचा संघ सदस्य आणि गुजरात टायटन्सचा कर्णधार शुभमन गिल तिसऱ्या क्रमांकावर आहे. सूर्यकुमार यादव ५१० धावांसह चौथ्या आणि विराट कोहली ५०५ धावांसह पाचव्या क्रमांकावर आहे.

साई सुदर्शन आयपीएलमध्ये सातत्याने चांगली कामगिरी करत आहे. गेल्या हंगामात त्याने गुजरात टायटन्सकडून खेळताना ५२% धावा केल्या होत्या. आयपीएल २०२५ मध्ये त्याने हा आकडा ओलांडला आहे. सुदर्शनने चालू हंगामात आता ६ अर्धशतके केली आहेत, ज्यामध्ये राजस्थान रॉयल्सविरुद्ध त्याने केलेल्या ८२ धावांच्या सर्वोच्च धावसंख्येचा समावेश आहे. साई सुदर्शनचा संघ सदस्य आणि गुजरात टायटन्सचा कर्णधार शुभमन गिल देखील ऑरेंज कॅपच्या शर्यतीत साई सुदर्शनच्या मागे धावत आहे. सुदर्शनने आतापर्यंत त्याच्या आयपीएल कारकिर्दीत १५०० हून अधिक धावा केल्या आहेत, ज्यामध्ये त्याच्या बॅटने एक शतक आणि १२ अर्धशतकांचा समावेश आहे.



# इटालियन ओपनचे अल्काराझला विजेतेपद

▶ **जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर पोहोचला**

**पॅरिस, दि. १९ :**

इटालियन ओपनच्या अंतिम फेरीत कार्लोस अल्काराझने जॅनिक सिन्नरचा ७–६ (७/५), ६–१ असा पराभव करून विजेतेपद पटकावले. या हंगामातील अल्कराजचे हे तिसरे जेतेपद ठरले. यासह तो जागतिक क्रमवारीत सिन्नरनंतर दुसऱ्या स्थानावर पोहोचेल. मोंटे कार्लोमधील विजयानंतर अल्काराझचे हे वर्षातील मास्टर्स १000' स्पर्धेचे दुसरे विजेतेपद आहे.

गेल्या वेळी चायना ओपनच्या अंतिम फेरीत अल्कराझकडून पराभव पत्करावा लागल्यानंतर सिनेरची २६ सामन्यांची विजयी मालिका खंडित झाली होती. २०२४च्या सुरुवातीपासून टूर फायनलमध्ये सिनरला हरवणारा अल्कराझ हा एकमेव खेळाडू आहे. २०२४च्या सुरुवातीला इटालियन ओपनच्या आधी अल्कराजने जॅनिक सिनरला हरवले होते. गेल्या वर्षाच्या सुरुवातीपासून सिनरला एकापेक्षा जास्त वेळा हरवणारा अल्काराज हा एकमेव टेनिसपटू आहे. त्याने आतापर्यंत सलग चार वेळा ही कामगिरी केली आहे.



मोनिका सेलेसनंतर पहिल्यांदाच जास्मिन पाओलिनीने इटालियन ओपनमध्ये एकेरी आणि दुहेरी दोन्ही विजेतेपदे जिंकली. तिने सारा एरानीसोबत दुहेरीचे विजेतेपद जिंकले आणि एकेरीत कोको गॉफला हरवून १९८५ नंतर रोममध्ये एकेरीचे विजेतेपद जिंकणारी पहिली इटालियन महिला ठरली.

# *गुजरातच्या सलामी जोडीने रचला इतिहास*

### एका पर्वात केली इतकी मोठी कामगिरी | गुजरातची विजयी घोडदौड सुरू

**बंगळुरू, दि. १९ :**

आयपीएल २०२५ स्पर्धेत गुजरात टायटन्सची विजयी घोडदौड सुरु आहे. सलामीचे फलंदाजच संघाला विजयाच्या वेशीवर आणून सोडत आहेत. गुजरात टायटन्सने दिल्लीला १० विकेट्सने पराभूत केले आणि प्लेऑफमध्ये स्थान मिळावले. यात शुबमन गिलने नाबाद ९३ आणि साई सुदर्शनने नाबाद १०८ धावा करत इतिहास रचला आहे.

आयपीएल २०२५ च्या ६०व्या सामन्यात गुजरात टायटन्सने दिल्ली कॅपिटल्सवर १० विकेट्सने दणदणीत विजय मिळवला. या विजयासह गुजरात प्लेऑफसाठी पात्र ठरला आहे. या सामन्यात शुबमन गिल–साई सुदर्शन यांनीही इतिहास रचला. आता हा इतिहास खोडून काढणं पुढे जाऊन वाटतं तितके सोपे नाही.

आयपीएल २०२५ च्या ६०व्या सामन्यात गुजरात टायटन्सने दिल्ली कॅपिटल्सवर १० विकेट्सने दणदणीत विजय मिळवला. या विजयासह गुजरात प्लेऑफसाठी पात्र ठरला आहे. या सामन्यात शुबमन गिल–साई सुदर्शन यांनीही इतिहास रचला. आता हा इतिहास खोडून काढणं पुढे जाऊन वाटते तितके सोपे नाही.

साई सुदर्शनने नाबाद १०८ धावा केल्या तर कर्णधार शुबमन गिल ९३ धावांवर नाबाद राहिला. गुजरातने दिल्लीने दिलेले



२०० धावांचे लक्ष्य विजयासाठी एक षटक शिल्लक असताना पूर्ण केले. या विजयासह गुजरात संघाने पुन्हा एकदा आपली क्षमता सिद्ध केली आहे. तसेच गुणतालिकेत पहिलं स्थान पटकावलं आहे.

साई सुदर्शनने नाबाद १०८ धावा केल्या तर कर्णधार शुबमन गिल ९३ धावांवर नाबाद राहिला. गुजरातने दिल्लीने दिलेले २०० धावांचे लक्ष्य विजयासाठी एक षटक शिल्लक असताना पूर्ण केले. या विजयासह गुजरात संघाने पुन्हा एकदा आपली क्षमता सिद्ध केली आहे. तसेच गुणतालिकेत पहिलं स्थान पटकावले आहे.

आयपीएल २०२५ स्पर्धेत ८०० पेक्षा जास्त धावा करणारी गिल–सुदर्शन जोडी इतिहासातील पहिली भारतीय जोडी ठरली. या जोडीने एकूण ८३९ धावा केल्या. आयपीएलच्या इतिहासात कोणत्याही भारतीय जोडीने केलेली सर्वोच्च भागीदारी आहे.

आयपीएल २०२५ स्पर्धेत ८०० पेक्षा जास्त धावा करणारी गिल–सुदर्शन जोडी इतिहासातील पहिली भारतीय जोडी ठरली. या जोडीने एकूण ८३९ धावा केल्या. आयपीएलच्या इतिहासात कोणत्याही भारतीय जोडीने केलेली सर्वोच्च भागीदारी आहे.

यापूर्वी, २०२१मध्ये धवन–पृथ्वी शॉ जोडीने ७४४ धावा केल्या होत्या, तर २०20 मध्ये केएल राहुल–मयंक अग्रवाल जोडीने ६७१ धावा केल्या होत्या. पण आता शुबमन गिल आणि साई सुदर्शन ही जोडी खूप पुढे निघून गेली आहे. अजूनही साखळी फेरीत दोन सामन्यांचा खेळ बाकी आहे. जर यातही बॅट चमकली तर १००० धावांचा पल्ला हमखास गाठतील.

यापूर्वी, २०२१मध्ये धवन–पृथ्वी शॉ जोडीने ७४४ धावा केल्या होत्या, तर २०20 मध्ये केएल राहुल–मयंक अग्रवाल जोडीने ६७१ धावा केल्या होत्या. पण आता शुबमन गिल आणि साई सुदर्शन ही जोडी खूप पुढे निघून गेली आहे. अजूनही साखळी फेरीत दोन सामन्यांचा खेळ बाकी आहे. जर यातही बॅट चमकली तर १००० धावांचा पल्ला हमखास गाठतील.

दिल्लीतील फिरोजशाह कोटला मैदानावर झालेल्या या सामन्यात साई सुदर्शन हा इम्पॅक्ट प्लेयर म्हणून उतरला होता. त्याने आयपीएलमधील दुसरे शतक झळकावले. फलंदाजीला अनुकूल असलेल्या खेळपट्टीवर गिल आणि सुदर्शन दोघांनीही आक्रमक खेळ केला.

दिल्लीतील फिरोजशाह कोटला मैदानावर झालेल्या या सामन्यात साई सुदर्शन हा इम्पॅक्ट प्लेयर म्हणून उतरला होता. त्याने आयपीएलमधील दुसरे शतक झळकावले. फलंदाजीला अनुकूल असलेल्या खेळपट्टीवर गिल आणि सुदर्शन दोघांनीही आक्रमक खेळ केला.


# टी–२० मध्ये गिलने घातला धुमाकूळ!

### विराटचा हा' विक्रम काढला मोडीत

**नवी दिल्ली, दि. १९ :**

शुबमन गिलला विराट कोहलीचा उत्तराधिकारी का मानले जाते? याचे आणखी एक उदाहरण आयपीएल २०२५ (आयपीएल २०२५) च्या ६० व्या सामन्यात घडले, जेव्हा गिलने दिल्ली कॅपिटल्सविरुद्धच्या सामन्यात ५३ चेंडूत नाबाद ९३ धावा केल्या. गिलने त्याच्या अर्धशतकी खेळीत विराट कोहलीचा मोठा विक्रम मोडला. शुभमन गिलने आता कोहलीला मागे टाकत टी२० क्रिकेटमध्ये सर्वात जलद ५००० धावा पूर्ण करणारा खेळाडू बनला आहे. गिलने टी२० क्रिकेटमध्ये १५४ डावांमध्ये ५००० धावा पूर्ण केल्या, तर कोहलीने टी२० क्रिकेटमध्ये १६७ डावांमध्ये ५००० धावा पूर्ण केल्या. भारताकडून टी२० मध्ये सर्वात जलद ५००० धावा पूर्ण करण्याचा विक्रम केएल राहुलच्या नावावर आहे. राहुलने फक्त १४३ डावांमध्ये ५००० टी२० धावा पूर्ण करण्याचा सर्वाधिक विक्रम केला.

त्याच वेळी, एकूण टी–२० मध्ये सर्वात जलद ५००० धावा करण्याचा विश्वविक्रम ख्रिस गेलच्या नावावर आहे. गेलने टी–२० मध्ये १३२ डावांमध्ये ही कामगिरी केली. टी–२० क्रिकेटमध्ये ५००० धावा करणारा गिल जगातील सहावा सर्वात जलद फलंदाज ठरला आहे.



या सामन्यात दिल्लीने प्रथम फलंदाजी केली आणि केएल राहुलच्या शतकाच्या जोरावर दिल्ली कॅपिटल्स संघाला २० षटकांत तीन गडी गमावून १९९ धावा करण्यात यश आले. दुसरीकडे, साई सुदर्शनच्या १०८ धावा आणि गिलच्या ९३ धावांच्या नाबाद खेळीच्या जोरावर गुजरात टायटन्सने १० गडी राखून सामना जिंकला. या विजयासह गुजरात संघ प्लेऑफमध्ये पात्र ठरला.

**सर्वात जलद ५००० टी–२० धावा करणारा भारतीय**

- १४३ डाव – केएल राहुल
- १५४ डाव – शुभमन गिल
- १६७ डाव – विराट कोहली
- १७३ डाव – सुरेश रैना

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २५७ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 257 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .